MHST160000842014

**नि.दि.मु.क्र. १७/२०१४ मधील नि. ७७ वरील**

**आदेश**

(निवृत्ती आबाजी भिलारे वि. एकनाथ कृष्णा भिलारे व इतर)

प्रतिवादीने सदरचा अर्ज, त्याच्याविरुध्द नि. ७७ लगत झालेला 'वादीचा उलटतपास नाही', चा आदेश सेट असाईड करुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप करुन मिळणेबाबत दाखल केला आहे. वादीने नि. ५८ लगत दि. ०७.०९.२०२२ रोजी पुराव्याचे शपथपत्र दिले असुन त्यावरील प्रतिवादीतर्फे उलटतपास प्रलंबित आहे. प्रतिवादीने उलटतपास मुदतीत घेतला नसल्यामुळे प्रतिवादीविरुध्द दि. ०७.०९.२०२२ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यादिवशी प्रतिवादी व प्रतिवादीचे वकील गैरहजर असल्यामुळे आदेश पारीत करण्यात आला. सदरचा दावा हा ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे. मुळ मुद्दे व खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी वादीचा उलटतपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे 'वादीचा उलटतपास नाही', चा आदेश सेट असाईड होवुन वादीचा उर्वरीत उलटतपास घेण्याची संधी मिळावी, अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल केले. त्यांनी प्रतिवादीचे म्हणणे नाकारले आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यास वादीला कोणतेही संयुक्तिक कारण नाही.अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल नाही. मोघम अर्ज दाखल करण्यात आले असुन मंजुर करावयाचे झाल्यास प्रतिवादीस र. रु. १०,०००/– कॉस्ट करण्यात यावी, अशी विनंती वादीने केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि. ०७.०९.२०२२ रोजी वादीचा साक्षीदार क्र. २ चा सरतपास नोंदविण्यात आला. त्यानंतर 'उलटतपास नाही' असे आदेश पारीत करण्यात आले. त्यानुसार प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब करण्यात आले. मे. कोर्टाने उलटतपास नाही चा आदेश रद्द

करुन प्रतिवादींना कॉस्ट लावुन संधी दिली आहे. दावा ९ वर्षे जुना आहे. एकुण अभिलेख पाहता असे दिसुन येते की, प्रतिवादीच्या निष्काळजीपणामुळे साक्षीदाराचा उलटतपास लांबलेला आहे. प्रतिवादीला उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता प्रतिवादीस कॉस्ट करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्ज नि. ७७ हा प्रतिवादीने खर्च र. रु. १००/- (र. रु. शंभर फक्त) वादींना दयावा.

ठिकाण - वाई. (सी. व्ही. शिरसाट)
दिनांक - २४.०१.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.